# सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१

**जाहिरात क्र. ०१/२००९**

१. सैनिक कल्याण विभागाच्या अधिपत्त्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील गट-क संवर्गातील खालील अ.क्र.(१) व (२) वरील फक्त दोन पदासाठी पात्र माजी सैनिकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

(१) वसतीगृह अधीक्षक - १ पद (अपंगांकरीता राखीव)

(२) कवायत प्रशिक्षक - १ पद

२. **पात्रताविषयक अटी :-**

(अ) भारतीय नागरीकत्व (उमदेवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे)

(ब) **शैक्षणिक अर्हता :-**

दोन्ही पदांकरीता उमेदवार शालांत प्रमाणपत्र परिक्षा म्हणजे एस.एस.सी. परिक्षा (मराठी भाषेसह उत्तीर्ण असावा) किंवा सैन्य दलातील तत्सम परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्रधारक असावा.

(क) **इतर अर्हता :-**

(१) दोन्ही पदांकरीता उमेदवाराचे वय दि. ०१/०९/२००९ रोजी ५० वर्षांपेक्षा जास्त नसावे

(२) दोन्ही पदांकरीता संरक्षण दलात कमीत कमी १५ वर्षे सेवा करुन ज्युनियर कमिशंड ऑफीसर पदावरुन सेवा निवृत्त झालेला असावा.

(३) वसतीगृह अधीक्षक या पदाकरीता संरक्षण दलात ज्युनियर कमिशंड ऑफीसर पदावर कमीतकमी ५ वर्षे सेवा झालेली असावी.

(४) वसतीगृह अधीक्षक या पदाकरीता **४०%** अपंगत्वासह सैन्य सेवतून निवृत्त झालेला असावा.

(५) कवायत प्रशिक्षक पदाकरीता सैन्य सेवेतील कवायत प्रशिक्षण प्रमाणपत्र धारक असावा. **(Drill Course Qualified)**

३. **वेतनश्रेणी :-** दोन्ही पदाकरीता रुपये ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे रुपये २४००/- (सहाव्या वेतन आयोगानुसार) अधिक अनुज्ञेय असलेले भत्ते शासन नियमानुसार देय असतील.

४. **अर्ज करण्याची पध्दती :-**

(१) उमेदवाराने ३० सें. मी. x २१ सें.मी. आकाराच्या जाड कागदावर अर्ज करावा. अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:चे नांव, पत्ता व पीनकोड क्रमांक स्पष्ट लिहावा. उमेदवाराने स्वत:च्या अक्षरात अर्ज भरुन त्यासोबत सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात, उमेदवाराने स्वत:चे नांव व संपुर्ण पत्ता लिहिलेले व त्यावर ५ रुपये किमतीची पोष्टाची तिकिटे घट्ट चिकटवलेले एक पाकीट अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना प्रत्येक जिल्हयाच्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात उपलब्ध आहे तसेच या विभागाची वेबसाईट www.mahasainik.com वर उपलब्ध आहे. उमेदवाराने पासपोर्ट आकाराचे उमेदवाराचे छायाचित्र आवेदन पत्रावर विहित जागी घट्ट चिकटवावे.

(२) उमेदवाराने अर्ज भरुन, अर्जासोबत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या छायांकीत प्रती जोडून त्यांचा अर्ज बंद पाकिटामध्ये खालील पत्त्यावर पाठवावा. अर्जाच्या लिफाफ्यावर कोणत्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नांव स्पष्टपणे लिहावे.

**पत्ता :- मा. संचालक,**
**सैनिक कल्याण विभाग,**
**महाराष्ट्र राज्य, रायगड इमारत,**
**राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर,**
**सोलापूर रस्ता, घोरपडी, पुणे ४११ ००१**

(४) उमेदवाराचा अर्ज वरील पत्त्यावर दि. **३१/७ /२००९** पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल अशा रितीने पाठविण्यात यावा. अर्ज व्यक्तिश: सादर करण्यात यावा. कोणत्याही कारणास्तव विहित दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

(५) अर्ज प्राप्त झाल्यानंतर व कागदपत्रे तपासणीनंतर पात्र उमेदवारांना पत्र पाठवून लेखी परिक्षेची तारीख व वेळ कळविण्यात येईल.

(६) अर्जासोबत शालांत परिक्षा उत्तीर्ण / शाळा सोडल्याचा दाखला / तत्सम परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, वय, सैन्य सेवा डिसचार्ज पुस्तक (सर्व पाने), माजी सैनिक ओळखपत्र, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात रोजगाराकरीता नांव नोंदणी केलेले प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र ( वसतीगृह अधीक्षक या पदाकरीता), कवायत प्रशिक्षण प्रमाणपत्र (कवायत प्रशिक्षक पदाकरीता) यांच्या छायांकीत सत्यप्रती आवेदन पत्रासोबत जोडाव्यात.

ठिकाण : पुणे - ०१

दिनांक : ०३ जुलै २००९

स्वाक्षरीत/- x x x

**(सुहास शं. जतकर)**

**कर्नल (निवृत्त)**

**संचालक**

*D:\dsw-२\EMPLOY~१\Add for the Post of Hostel SupdtDrill Instructior.doc*

# सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

## अर्जाचा नमुना

| **कार्यालयीन कामासाठी** | | उमेदवाराचा फोटो या ठिकाणी चिकटवावा |
|---|---|---|
| **उमेदवाराचा नोंदणी क्रमांक** | | |
| | | |
| HSM /DRILL INSTR / /2009 | | |
| | | |
| **पदाचे नांव** | **वसतीगृह अधीक्षक / कवायत प्रशिक्षक** | |

---

टिप : अर्जातील माहिती काळजीपुर्वक व आपल्याकडे असलेल्या कागदपत्रांच्या आधारे भरावी. एकदा भरलेल्या माहितीमध्ये बदल करता येणार नाही.

| **अ. क्र.** | **माहितीचा तपशील** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **उमेदवाराचे नांव** | | | | | | | | | |
| | **मराठी** | **आडनाव** | | **स्वतःचे नाव** | | | **वडीलांचे नाव** | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | **इंग्रजी** | **(Capital letters)** | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| २. | **जन्मतारीख** | | | | | | | | | |
| | तारीख | | माहिना | | | वर्ष | | | | |
| | | | | | | | | | | |
| ३. | दि. ०१ सप्टेंबर २००९ रोजी असलेले वय | | | | | वर्षे | | महिने | | |
| | | | | | | | | | | |
| ४. | महाराष्ट्र राज्याचे मूळ रहिवासी आहात काय ? | | | | | होय | | नाही | | |
| ५. | उमेदवाराचा पत्ता | राहणार : | | | | | | | | |
| | **पत्ता मराठीतच लिहावा** | | | | | | | | | |
| | | तालुका : | | | | | | | | |
| | | जिल्हा : | | | | पीन कोड : | | | | |
| | संपर्कासाठी दूरध्वनी | (STD Code) | | | : ९५ | | | | | |
| | | Telephone / Mob No : | | | | | | | | |

| ६. | शालांत किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या परीक्षांचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|
| **परीक्षेचे नाव** | **संस्था/विद्यापिठ** | **विषय** | **परीक्षा पास केल्याचे वर्ष** | **गुणांची टक्केवारी** |
| एसएससी | | | | |
| एचएससी | | | | |
| पदवी | | | | |
| इतर | | | | |
| संगणक कोर्स | | | | |

| ७. | **सैन्यसेवेची माहिती** | | |
|---|---|---|---|
| (ए) | सैन्यसेवा क्रमांक | | |
| (बी) | सैन्यातील रँक व ट्रेड | | |
| (सी) | भरतीची तारीख | | |
| (डी) | सैन्यसेवा निवृत्ती तारीख | | |
| (इ) | जे.सी. ओ. पदावरील एकूण सेवा | **वर्षे --------महिने--------** | |
| (ई) | सैन्यातील एकुण सेवा | **वर्षे -** | **महिने-** |
| (एफ) | सैन्यसेवा निवृत्तीचे कारण | | |
| (जी) | सैन्यातील वर्तणुक | | |
| (एच) | युनिट/कोर | | |
| (आय) | अभिलेख कार्यालयाचे नांव (Record office) | | |
| ८. | **जिल्ह्याच्या रोजगारपटावर नोंदणी करण्यात आलेल्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे नांव व नोंदणी क्रमांक** | जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय<br>नोंदणी क्रमांक : | |
| ९. | **माजी सैनिक ओळखपत्र क्रमांक** | | |

टिप : उमेदवाराने अर्जावर स्वतःचा फोटो व अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार शालांत / उच्च माध्यमिक तसेच तत्सम परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, मराठी व इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र, संगणक कोर्सचे प्रमाणपत्र, सैन्यसेवा डिस्चार्ज बुकाची प्रत, पर्चमेंट प्रमाणपत्र माजी सैनिक ओळखपत्र इत्यादीच्या सुस्पष्ट व वाचण्यायोग्य झेरॉक्स प्रती साक्षांकीत करुन अर्जासोबत जोडाव्यात.

## उमेदवाराने स्वाक्षरीत करावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, असे प्रमाणित करतो की, वरील अर्जामध्ये भरुन दिलेली माहिती बरोबर व पुर्णता सत्य आहे. मी अर्जात दिलेली **माहिती खोटी अगर चुकीची** आढळुन आल्यास, या माहितीच्या आधारे मिळालेली नोकरी गमाविण्यास मी बाध्य राहीन व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीससुद्दा पात्र राहीन. **याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही**. सदर पद बदली पात्र असुन उपलब्धतेनुसार महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात नियुक्ती अथवा बदली होऊ शकते याची मला जाणीव आहे व त्या अनुषंगाने मी त्या ठिकाणी काम करण्यास तयार आहे.

| दिनांक | | **उमेदवाराची स्वाक्षरी** | |
|---|---|---|---|
| ठिकाण | **पुणे-०१** | मराठीत | |
| | | इंग्रजीत | |